स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२२–२३/७८२ दि. २२/०९/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

**विषय : स्वच्छता ही सेवा(SHS) दि. १५ सप्टेंबर २०२२ ते दि. ०२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत गावांच्या स्वच्छतेची राष्ट्रव्यापी मोहीमेबाबत**

महोदय,

मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांनी पाठविलेल्या पत्रानुसार स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा–२ अंतर्गत दिनांक १५ सप्टेंबर २०२२ ते दिनांक ०२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहिमेचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मार्फत आयोजन करण्यात आले आहे. गावांची दृश्यमान स्वच्छता, ही स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमाची संकल्पना आहे. तरी स्वच्छता ही सेवा (SHS) मोहिमेमध्ये दत्तक गावांमध्ये आपल्या महाविद्यालयामार्फत पुढील उपक्रमाकरिता योग्य ते सहकार्य करावे.

१. गवांमध्ये दृश्यमान स्वच्छता करण्यात यावी.
२. गावातील कचरा कुंडया व असुरक्षित ठिकाणांची साफसफाई करावी.
३. कचरा स्त्रोतांच्या ठिकाणी सुका कचरा व आला कचरा वेगळे करण्यासाठी जनजागृती करण्यात यावी.
४. कचरा संकलन आणि विलगीकरण करण्यासाठी केंद्र निर्माण करावे.
५. कचरा वाहन्याकरिता वाहनांचा वापर करावा.
६. प्लॅस्टिकसारखा जैविक विद्यटन न करता येणारा कचरा घरोघरी एकत्रित करून नियोजन करावे.
७. पाणवठ्यांजवळील परिसर स्वच्छ ठेवून त्यांच्या सभोवताली वृक्षारोपण करावे.
८. हागणदारीमुक्त गाव या घटकावर सरपंच संवाद आयोजित करणे.
९. घोषवाक्य लेखन/प्रतिज्ञा घेणे "कचरा न करणे."

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत स्वच्छता ही सेवा या मोहिमेमध्ये महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. सदर मोहिमेमध्ये राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता आपल्या महाविद्यालय व परिसंस्थांच्या माध्यमातून ही मोहिम प्रभावीपणे राबवण्याकरिता दत्तक गावातील सरपंच/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करण्यात यावे. या उपक्रमाचा एकत्रीत अहवाल व फोटो त्वरीत nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर 'स्वच्छता ही सेवा(SHS)' या विषयासह पाठवण्यात यावा. कळावे, ही विंनती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक महितीकरिता : मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
७ वा मजला, गो.ते. रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
संकेतस्थळ www mahawssd.gov.in Email: smita.rane@nic.in

क्र.स्वभामि-२०२२/प्र.क्र.२३९/पापु-१६ दिनांक:- १४/०९/२०२२

प्रति,

डॉ. प्रकाशकुमार वानंजे,
राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग,
धोबी तलाव, मुंबई-४००००१

विषय : "स्वच्छता ही सेवा" (SHS) दि.१५ सप्टेंबर २०२२ ते दि. २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत गावांच्या दृष्यमान स्वच्छतेची राष्ट्रव्यापी मोहीमेबाबत.

संदर्भ: केंद्र शासनाचे पत्र क्र. S-१३०१५/३७/२०२१-IEC दि.२६.०८.२०२२

महोदय,

उपरोक्त विषयी केंद्र शासनाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशास अनुसरुन, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत दिनांक १५ सप्टेंबर २०२२ ते दिनांक २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत "स्वच्छता ही सेवा" मोहिमेचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मार्फत आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांना सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. (प्रत सोबत)

गावांची दृश्यमान स्वच्छता, हि "स्वच्छता ही सेवा" या कार्यक्रमाची संकल्पना आहे. "स्वच्छता ही सेवा " (SHS) मोहिमेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे :-

१. गावांमध्ये दृश्यमान स्वच्छता

२. गावातील कचरा कुंड्या व असुरक्षित ठिकाणांची साफसफाई

३. कचरा स्त्रोतांच्या ठिकाणी (सुका व ओला) वेगळे करण्यासाठी जनजागृती करणे.



Scanned with OKEN Scanner

४. कचरा संकलन आणि विलगीकरण करण्यासाठी केंद्र निर्माण करणे.

५. कचरा वहनाकरिता वाहनांची खरेदी करणे

६. प्लॅस्टिकसारखा जैविक विघटन न करता येणारा कचरा घरोघरी एकत्रित करुन नियोजन करावे.

७. पाणवठ्यांजवळील परिसर स्वच्छ ठेवून त्यांच्या सभोवताली वृक्षारोपण करावे.

८. एकल प्लॅस्टिक वापराच्या (SUP) च्या दुष्परिणामांबद्दल सभा आयोजित करून यापुर्वी प्लॅस्टिक वापरावर बंदीबाबत घेतलेल्या ठरावांची अंमलबजावणी करावी.

९. हागणदारीमुक्त अधिक घटकांवर सरपंच संवाद आयोजित करणे.

१०. घोषवाक्य लेखन/प्रतिज्ञा घेणे " कचरा न करणे "

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) अंतर्गत "स्वच्छता ही सेवा" या मोहिमेमध्ये महाराष्ट्र आतापर्यंत नेहमीच अग्रेसर राहिला आहे. यापुढे देखील **"स्वच्छता ही सेवा"** मोहिमेत राज्यास देशामध्ये अग्रस्थानी ठेवण्याच्या अनुषंगाने, सदर मोहिमेमध्ये **राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत** समाविष्ट सर्वांनी सहभागी होणे बाबत तसेच, सदर मोहिमेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता, राज्यातील जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यांच्या समन्वयाने कार्यक्रमांची आखणी करुन आवश्यक सहाय्य करणे बाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, हि विनंती.

सोबत:वरीलप्रमाणे

**( स्मिता राणे)**
**कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन**

प्रत-

१. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
३. जिल्हा समन्वयक, स्वच्छ भारत अभियान(ग्रामीण) तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) , जिल्हा परिषद, सर्व.
४. संग्रहार्थ



Scanned with OKEN Scanner